दैनिक
# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक सागर राणा अभोरे    संपादक बडूभाऊ इगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■ बुधवार दिनांक 11 जून 2025 ■ वर्ष : २ रे ■ अंक : 17 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935

## ‘एकच प्याला’ महागला

- मद्यावरील राज्य उत्पादन शुल्कात वाढ
- देशी बनावटीची तसेच विदेशी दारू महागणार
- राज्याला १४ हजार कोटींचा अतिरिक्त महसूल मिळणार
- राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय



### नवीन मद्य प्रकार, महाराष्ट्र मेड लिकर

राज्यातील उत्पादकांसाठी महाराष्ट्र मेड लिकर (एमएमएल) हा धान्याधारित विदेशी मद्याचा नवीन प्रकार तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये फक्त महाराष्ट्रातील मद्य उत्पादक असे उत्पादन करू शकतील. त्यांना या नव्या प्रकारातील उत्पादनाची (ब्रँड) नवीन नोंदणी करून घेणे आवश्यक राहील.

### दारूचे जुने दर

- ✔ देशी मद्य - ७० रुपये
- ✔ महाराष्ट्र मेड लिकर - नवीनमद्य प्रकार
- ✔ भारतीय बनावटीचे विदेशी मद्य - १२० रुपये
- ✔ विदेशी मद्य - २१०

### अशी असेल नवीन दरवाढ

- ✔ देशी मद्य - ८० रुपये
- ✔ महाराष्ट्र मेड लिकर - १४८ रुपये
- ✔ भारतीय बनावटीचे विदेशी मद्य - २०५ रुपये
- ✔ विदेशी मद्याचे प्रीमियम ब्रँड - ३६० रुपये

**मुंबई :** राज्य सरकारने ‘लाडक्या बहिणीं’ची मर्जी राखण्यासाठी मद्यपींच्या खिशात हात घालण्याचा निर्णय मंगळवारी घेतल्याने तळीरामांना आता दारू पिण्यासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. ‘लाडक्या बहिणीं’मुळे आर्थिक संकटात सापडलेल्या राज्य सरकारने दारुवरील राज्य उत्पादन शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याने ‘ एकच प्याला’ महागणार आहे.

देशी, महाराष्ट्र मेड, भारतीय बनावटीचे विदेशी मद्य, विदेशी मद्य यावरील करात वाढ करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या माध्यमातून राज्य सरकारच्या तिजोरीत सध्या २५ हजार कोटी रुपयांचा महसूल जमा होत होता. आता मद्यावरील शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याने सरकारच्या तिजोरीत वर्षाला १४ हजार कोटींचा अतिरिक्त महसूल जमा होईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्याने सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दारूवरील करवाढीला मंजुरी देण्यात आली.

महायुती सरकारने जाहीर केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी पैशांची जुळवाजुळव करणे सध्या डोकेदुखी ठरू लागली आहे. राज्याला अधिकाधिक महसूल मिळावा यासाठी प्रयत्न करा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल, राज्य उत्पादन शुल्क आदी विभागांना देण्यात आले आहेत.

त्यानुसार विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी कामाला लागले असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क खात्याची जबाबदारी आल्यानंतर या विभागाने महसूल वाढविण्याच्या दृष्टीने सचिवस्तरीय अभ्यासगट स्थापन केला होता. या गटाने मद्यनिर्मिती धोरण, अनुज्ञप्ती (परवाना), उत्पादन शुल्क तसेच कर संकलन वाढीसाठी तेलंगणा, मध्य प्रदेशसह इतर राज्यातील राबविण्यात ‹› संमिश्र पानावर

## दिल्लीत इमारतीला आग; वडिलांसह दोन मुलांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** राजधानातील द्वारका भागात एका अपार्टमेंटच्या सातव्या मजल्यावर आग लागली. त्यानंतर संपूर्ण अपार्टमेंटमध्ये ही आग पसरली. यावेळी घाबरून इमारतीतील एका कुटुंबातील वडील, दोन मुलांनी सातव्या मजल्यावरून खाली उडी मारली. या दुर्घटनेत तिघेही मरण पावले. अग्निशमन दलाच्या माहितीनुसार, द्वारका सेक्टर-१३मधील एका अपार्टमेंटमध्ये आग लागल्याची माहिती आम्हाला मिळाली. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहचले. आग भडकल्यानंतर एका व्यक्तीने आपल्या मुलांसह खाली उडी मारली. त्यांना जखमी अवस्थेत रुग्णालयात नेले असता मृत घोषित करण्यात आले, तर त्यांची पत्नी व मोठा मुलगा या दुर्घटनेत बचावले आहेत. त्यांना उपचारासाठी आयजीआय रुग्णालयात दाखल केले आहे. या सोसायटीतील वीज, पीएनजी कनेक्शन बंद करण्यात आले आहे.

## भाडेवाढ न करता सर्व लोकल करणार एसी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची योजना



### महायुतीचाच महापौर

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीकडून योग्य ती तयारी सुरू आहे. मुंबई महानगरपालिकेत महायुतीचे सरकार सत्तेत येणार आणि महायुतीचाच महापौर असणार, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### १० वर्षांतील निधी एकाच वर्षात महाराष्ट्रात

महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात रेल्वेचे पावणेदोन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. यूपीएच्या काळात १० वर्षांत जो निधी दिला तितका निधी एकाच वर्षात मोदी सरकारने दिला. सहा लाख कोटी रुपयांची पायाभूत सुविधांची कामे झाली आहेत. १ लाख घरे देण्याचा विक्रम केला. जी यादी होती ती सर्व समाप्त होत आहे. नवीन यादी तयार करत सर्वेक्षण करण्यास सांगितले आहे, असे फडणवीस म्हणाले.

**मुंबई :** मुंब्रा येथील रेल्वे अपघाताची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आता अधिकाधिक वातानुकूलित लोकल प्रवासी सेवेत आणण्याचे नियोजन करण्यात येत आहे. प्रवाशांच्या सेवेत एसी लोकल सेवा आणताना जादा तिकीट दराचा भार प्रवाशांवर पडू नये यासाठी नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला ११ वर्षे पूर्ण झाल्याने या ११ वर्षांतील विकासकामांची माहिती देणारे ‘ सेवा आणि सुशासनाची अकरा वर्षे’ पुस्तकाचे प्रकाशन मंगळवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले की, ‘आत्मनिर्भर भारत ते विकसित भारताकडे जाण्याची ही ११ वर्षे आहेत. परिवर्तनशील दशक पूर्ण करत एका दशकाची ही वाटचाल आहे’. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री आशिष शेलार आदी उपस्थित होते.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. यात प्रवाशांच्या वेळेची बचत व्हावी यासाठी ‘एक तिकीट’ योजना अंमलात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुंब्रा येथील रेल्वे अपघाताची घटना दुर्दैवी असून अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी रेल्वे प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात ‹› संमिश्र पानावर

## रेल्वे दुर्घटनेचे कारण गुलदस्त्यातच

### वळणामुळे दुर्घटना घडली नसल्याचा रेल्वेचा दावा



**मुंबई :** मध्य रेल्वे मार्गावरील दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान सोमवारी झालेल्या दुर्घटनेचे कारण अद्यापही गुलदस्त्यात आहे. रेल्वे अधिकाऱ्यां नी घटनास्थळी रेल्वे रुळांच्या वळणाचे मोजमाप केले. यामध्ये रेल्वे रुळांचे वळण या घटनेला कारणीभूत नसल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. तसेच रेल्वे स्थानकांमधील कॅमेऱ्यांमध्ये प्रवासी पडतानाचे चित्रीकरण झाले नसल्याने तपासामध्ये अडचणी येत आहेत.

दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान झालेल्या दुर्घटनेत ४ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, तर जखमी प्रवाशांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. ‹› संमिश्र पानावर

### प्रवासी पडतानाचे दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद नाही

मुंब्रा स्थानकातील फलाटावर असलेल्या ‘सीसीटीव्ही’ कॅमेऱ्यामध्ये लोकल येत असल्याचे दृश्य कैद झाले आहे. मात्र, लोकलमधील लोक रुळावर पडतानाचे दृश्य कैद झाले नसल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले. यामुळे घटनेचे कारण समजण्यास अडथळा येत असल्याचे रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले. ज्या लोकलमधील डब्यातून प्रवासी पडले तो डबा तपासणीसाठी कळवा कारशेडमध्ये पाठवण्यात आला आहे.

## नगरविकास विभागाकडून प्रभाग रचनेचे आदेश

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** साडेतीन वर्षांनंतर मुंबई महापालिकेसह राज्यातील महापालिका, नगर परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. राज्यातील २९ महानगरपालिका, नगर परिषदेच्या प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्याच्या नगरविकास विभागाने मंगळवारी जारी केले आहेत. या प्रभाग रचनेसाठी गुगल मॅपचा आधार घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नगरविकास विभागाने प्रभाग रचना करण्याचे आदेश दिल्याने पुढील तीन ते चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडतील, असा अंदाज वर्तवला जात आहे.

### मुंबईसाठी मनपा आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती

### मुंबईत २२७ प्रभागांत प्रभाग रचना

नगरविकास विभागाच्या आदेशानुसार, मुंबईत २२७ प्रभागात प्रभाग रचना करण्यात येणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचे आदेश जारी केले आहेत, तर ठाणे, नाशिकसह अ, ब, क वर्ग महापालिकांत चार सदस्यीय प्रभागरचना करण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ प्रभागांनुसार, तर ‘ड’ वर्गातील १९ महापालिकां ची प्रभाग रचना करण्याचे ‹› संमिश्र पानावर

## ...तर पाकिस्तानमध्ये घुसून हल्ला करणार - जयशंकर



**ब्रुसेल्स :** यापुढे पाकिस्तानने जर भारताला चिथावणी दिली तर भारत पाकिस्तानच्या कोणत्याही भागात घुसून हल्ला करण्यास सज्ज आहे, असा इशारा परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी ब्रुसेल्स भेटीदरम्यान ‘ पॉलिटिको’शी बोलताना दिला. पाकिस्तान हा एक असा देश आहे, जो दहशतवादाचा वापर देशाचे धोरण म्हणून करतो आणि हाच कळीचा मुद्दा आहे, असेही जयशंकर म्हणाले.

‘पॉलिटिको’शी बोलताना डॉक्टर जयशंकर म्हणाले, ‘ऑपरेशन सिंदूर’दरम्यान भारताच्या लढाऊ विमानांनी आणि क्षेपणास्त्रां नी पाकिस्तानचे मोठे नुकसान ‹› संमिश्र पानावर

## ऑस्ट्रियातील शाळेत अंदाधुंद गोळीबार; ९ ठार

**व्हिएन्ना :** ऑस्ट्रियातील ग्राझ शहरातील एका शाळेत विद्यार्थ्याने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात ९ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. गोळीबार करणाऱ्या विद्यार्थ्याने त्यानंतर शौचालयात जाऊन स्वतःवरही गोळी झाडून आत्महत्या केली.

एक विद्यार्थी बंदूक घेऊन थेट शाळेत पोहोचला होता आणि त्याने अंदाधुंद गोळीबार केला. यानंतर विद्यार्थ्याने वॉशरूममध्ये जाऊन स्वतःवरही गोळी झाडून आत्महत्या केली. पोलिसां ना सकाळी १० वाजता माहिती मिळताच ‹› संमिश्र पानावर

## जगभरात पाकिस्तानचा बुरखा फाडला!

### सर्वपक्षीय शिष्टमंडळांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांमुळे ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवावे लागले, याची माहिती जगभरातील देशांना देण्यासाठी गेलेल्या सर्वपक्षीय शिष्टमंडळांतील सदस्यांनी मायदेशी परतल्यानंतर मंगळवारी रात्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन चर्चा केली. पाकिस्तानच्या कारवायांची जगभरातील देशांना



माहिती देऊन पाकचा बुरखा फाडल्याची माहिती यावेळी सदस्यांनी पंतप्रधानांना दिली.

यावेळी सर्वपक्षीय शिष्टमंडळातील अनेक पक्षांचे नेते उपस्थित होते. पंतप्रधान निवासस्थानी झालेल्या या भेटीत सदस्यांनी आपले अनुभव पंतप्रधानांना कथन केले. या शिष्टमंडळात ‹› संमिश्र पानावर

## मुदा घोटाळ्याप्रकरणी १०० कोटींची मालमत्ता जप्त

**बंगळुरू :** कोट्यवधी रुपयांच्या कथित मुदा घोटाळ्यात कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचा सहभाग असल्याच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) एकूण १०० कोटी रुपयांच्या ९२ मालमत्तांवर टाच आणल्याने कर्नाटकच्या राजकारणात खळबळ माजली आहे.

### ईडीची कारवाई



सक्तवसुली संचालनालयाच्या बंगळुरू येथील विभागीय कार्यालयाने एकूण ९२ स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. या स्थावर मालमत्तांचे बाजारमूल्य अंदाजे १०० कोटी रुपये आहे. ईडीने ही कारवाई आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा म्हणजेच ‹› संमिश्र पानावर



हा एक बोर्ड अर्जंट रंगवून द्या!

### ‘एसबीआय’च्या अहवालातील माहिती

## भारतीयांचे घरगुती कर्ज वाढतेय, पण चिंता नको!

**नवी दिल्ली :** गेल्या तीन वर्षांपासून भारतात घरगुती कर्जाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. पण, या कर्जामुळे चिंता करण्याची गरज नाही, असे मत ‘एसबीआय’ने आपल्या अहवालात व्यक्त केले आहे.

बँकेने सांगितले की, भारतातील घरगुती कर्ज हे परतफेड करता येण्यासारखे असून त्याची चिंता करण्याची गरज नाही. कारण कर्जाच्या पोर्टफोलिओचा दोन तृतीयांश भाग उच्च दर्जाचा आणि कर्ज गुणवत्तेपेक्षा जास्त आहे आणि ही वाढ सरासरी कर्जबाजारीपणात वाढ होण्याऐवजी कर्जदारांच्या वाढत्या संख्येमुळे आहे.




### व्याजदर कपातीमुळे कर्जदारांना दिलासा

किरकोळ व एमएसएमई कर्जाचे पोर्टफोलिओ हे ‘एक्स्टर्नल बेंचमार्क लेंडिंग रेट’ला जोडलेले आहेत. त्यामुळे व्याजदरात कपात झाल्याने घरगुती बचतीत ५० हजार ते ६० हजार रुपये दरमहा वाचणार आहेत. हे व्याज कपातीचे चक्र सुमारे दोन वर्षे चालू राहण्याचा अंदाज आहे. ज्यामुळे घरगुती कर्जावरील व्याजदरात घट होण्यास हातभार लागेल.

या कर्जामुळे संपत्ती निर्मितीही होताना दिसत आहे. गृह व वाहन कर्जाचे प्रमाण २५ टक्के आहे, तर कृषी, उद्योग, शिक्षण या उत्पादित कर्जाचे प्रमाण ३० टक्के आहे.

आरबीआयच्या म्हणण्यानुसार, घरगुती कर्जाचे प्रमाण फेडले जाण्यासारखे आहे. त्यातील दोन तृतीयांश कर्जदाते हे परतफेड करणारे आहेत.

भारतातील घरगुती कर्जाचे प्रमाण अन्य विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेपेक्षा कमीच आहे. अन्य देशात घरगुती कर्जाचे प्रमाण ४९.१ टक्के असते, तर भारतात हेच प्रमाण ४२ टक्के आहे.

देशातील घरगुती कर्जामध्ये ४५ टक्के कर्ज हे वैयक्तिक स्वरूपाची आहे. त्यात क्रेडिट कार्ड, ग्राहकोपयोगी वस्तूंचे कर्ज आदींचा समावेश आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नुकत्याच जाहीर केलेल्या पतधोरणात कर्जात ५० बेसिस पॉइंटने कपात केली. यंदा आरबीआयने रेपो दरात १ टक्का कपात केली. त्यामुळे घरगुती कर्जदारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## भारतासह जगभरात ‘चॅटजीपीटी’ बंद

### वापरकर्त्यांकडून सोशल मीडियावर तक्रारी




**नवी दिल्ली :** भारतासह जगभरातील ‘ चॅटजीपीटी’ बंद पडल्याचा फटका मंगळवारी शेकडो वापरकर्त्यांना बसला. ‘डाऊनडिटेक्टर’ या संकेतस्थळानुसार, भारतात दुपारी ३ वाजल्यापासून ‘ चॅटजीपीटी’ वापरताना अडचणी येत असल्याची तक्रार अनेकांनी सोशल मीडियावर नोंदविली.

या तक्रारींपैकी ८२ टक्के तक्रारी वेबवर ‘ चॅटजीपीटी’ वापरताना अडचणी येत असल्याच्या आहेत, तर १४ टक्के युजर्सनी ‘मोबाइल अॅप्लिकेशन’ वापाताना अडचण येत असल्याची तक्रार केली आहे. तसेच चार टक्के युजर्सनी ‘एपीआय इंटिग्रेशन’शी संबंधित तक्रार केली आहे. केवळ भारतातूनच ‹› संमिश्र पानावर

## संपादकीय

# किलोभर बटाटे १,९६५ रुपये! गाझा बेहाल!

बिस्किट म्हटलं की आजही लहान-मोठ्यांच्या तोंडाला पाणी सुटतं. सकाळी चहा-कॉफीबरोबर अनेकांना बिस्किटंच हवी असतात. त्याशिवाय त्यांची सकाळ पूर्ण होत नाही. त्यातही भारतात तर 'पार्ले-जी' बिस्किटांचा फारच बोलबाला आहे. इतक्या वर्षांत ना त्यांचा स्वाद बदलला, ना किमतीत फारसा बदल झाला! लहान मुलांपासून ते कष्टकऱ्यांपर्यंत आजही चवीसाठी आणि भुकेसाठी अनेकांची या बिस्किटांना पसंती असते. या बिस्किटांच्या एका पुड्याची किंमतही आहे फक्त पाच रुपये! पाच रुपयांचा बिस्किटाचा हा पुडा गाझा पट्टीत किती रुपयांना मिळावा? इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्धामुळे गाझा पट्टीतील हजारो, लाखो लोक भुकेनं अक्षरश: तडफडताहेत. जीवनावश्यक गोष्टी एकतर त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत, पोहोचल्या तर गरजूंना त्या मिळत नाहीत. मधल्या मध्ये हडप होतात आणि त्याच वस्तू नंतर प्रचंड महाग किमतीत विकल्या जातात.

गाझातील एका पालकानं सोशल मीडियावर नुकतीच टाकलेली एक पोस्ट सध्या प्रचंड व्हायरल होते आहे. त्यात म्हटलं आहे, महत्प्रयासांनी का होईना, माझ्या लाडक्या मुलीला; रऊफला अखेर पार्ले-जी बिस्किटांचा पुडा मिळाला! ती आणि मी, आम्ही दोघंही त्यामुळे प्रचंड खूश आहोत! फक्त या पुड्यांचा बॉक्स आम्हाला दीड युरोऐवजी २४ युरोला विकत घ्यावा लागला! म्हणजे त्यासाठी या पालकाला किती रुपये मोजावे लागले? जो बिस्किटचा पुडा आपल्याकडे पाच रुपयांना मिळतो, त्यासाठी त्याला चक्क जवळपास २४०० रुपये मोजावे लागले! एका बिस्किटाच्या पुड्यासाठी गाझामध्ये तब्बल पाचशे पट जास्त रक्कम मोजावी लागल्याच्या या घटनेमुळे सगळीकडे आश्चर्य व्यक्त केलं जात असतानाच गाझातील लोकांच्या हलाखीची परिस्थितीही त्यामुळे अधिकच अधोरेखित झाली आहे. युद्धामुळे गाझा पट्टीतील लोक अक्षरश: दाण्या-दाण्याला मौताद झाले आहेत. रोजच्या रोज तिथे भूकबळी जाताहेत. विविध देशांतून तिथे मानवीय मदतही पाठवली जातेय; पण ती लोकांपर्यंत पोहोचते का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. २०२३पासूनच गाझा पट्टीत महागाई आकाशाला पोहोचली आहे. प्रत्येक गोष्टीची कमतरता आहे. त्यामुळे ज्याच्याकडे जी वस्तू असेल, ती तो मनमानी किमतीला विकतो आहे. आत्ताही २ मार्च ते १९ मे पर्यंत पॅलेस्टिनी लोकांना संपूर्ण नाकाबंदीचा सामना करावा लागला. आंतरराष्ट्रीय मदत तर येत होती; पण, ती गाझा पट्टीतील लोकांपर्यंत पोहोचतच नव्हती. आंतरराष्ट्रीय दबावानंतर त्यातले काही ट्रक गाझात सोडण्यात आले. त्यांचीही मोठ्या प्रमाणात लुटालूट झाली. गाझामध्ये राहणारे सर्जन डॉ. खालिद अलशवा यांचं म्हणणं आहे, हा प्रश्न जीवनावश्यक वस्तूंच्या निर्यातीचा किंवा त्यांच्यावरील टॅक्सचा नाही. कारण या वस्तू तर मुख्यत: येथे फुकटच येतात; पण, लगेच त्यांची लूटमार होते. गरजवंतांची संख्या लाखोंच्या घरात आणि वस्तू येतात हजारांच्या घरात, अशावेळी 'बळी तोच कानपिळी'! ज्याच्या हातात या वस्तू पडतात, तो काळ्या बाजारात त्या विकतो! काय असाव्यात या किमती?.. एक किलो साखर ४,९१४ रुपये, एक किलो गोडेतेल ४,१७७ रुपये, एक किलो बटाटे १,९६५ रुपये, एक किलो कांदे ४,४२३ रुपये आणि एक कप कॉफी १,८०० रुपये!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दौरा

अकोला- : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या (११ जून) अकोला येथे येत आहेत.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे: मुंबईवरून दु. १.४० वा. अकोला विमानतळ येथे आगमन व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना. दु. २ वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण कार्यक्रम, दु. २.४० वा. मोटारीने अकोला क्रिकेट क्लबकडे प्रयाण, दु. २.४५ वा. अकोला क्रिकेट क्लब येथे आगमन, दु. २.४५ वा. कार्यकर्ता संवाद जाहीर सभा, दु. ३.४५ वा. अकोला विमानतळाकडे प्रयाण, दु. ४ वा. अकोला विमानतळ येथे आगमन व विमानाने नागपूरकडे प्रयाण.

## पालकमंत्री अड. आकाश फुंडकर यांचा दौरा

अकोला- : राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अड. आकाश फुंडकर उद्या (११ जून) अकोला येथे आहेत. त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : दु. १२ वा. अकोला येथे आगमन व राखीव. दु. १२.३० वा. अकोला विमानतळ येथे मा. मुख्यमंत्री महोदयांच्या आगमन प्रसंगी उपस्थिती, दु. १ वा. अकोला जिल्ह्यातील, तसेच महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण, दु. १.१५ वा. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत अकोला क्रिकेट क्लबच्या मैदानावर सभा, दु. ४.३० वा. अकोला विमानतळ येथून मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मुंबईकडे प्रयाणप्रसंगी उपस्थिती, सोयीनुसार खामगावकडे प्रयाण.

## समाज कल्याण विभागाचा निधी इतरत्र वळविल्याने मागासवर्गीयांवर अन्याय.

### विविध संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन




महाराष्ट्र जीत

वाशीम(प्रतिनिधी)महाराष्ट्र शासन समाज कल्याण विभागाने समाज कल्याण अंतर्गत येणाऱ्या सर्व मागासवर्गीयांच्या विकास योजनेसाठी विविध प्रकारचा निधी उपलब्ध असतो. परंतु महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निधी इतरत्र वळवून मागासवर्गीय समाजावर अन्याय केला आहे.हा अन्याय केल्याने मागासवर्गीयांच्या विविध विकास रखडणार आहेत.शिवाय मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक शिष्यवृत्ती ही देखील मिळण्यास विलंब होत असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती तात्काळ वितरीत कराव्यात. अशाप्रकारे दि.१० जून रोजी वाशीम जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनेच्या वतीने विद्यमान जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.निवेदनावर डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान,वज्रदेही विकास संघाच्या अध्यक्षा आरती ताई ठोके, समाजसेवक तथा युवा नेतृत्व संतोष इंगळे, समाजसेवक वसंतराव हिवराळे,भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष विशाल पडघान, रविना जाधव, कविता डोंगरदिवे, संविधान ढोले अदिच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांची यवतमाळला बदली

### नांदेडला जिल्हा नियोजन अधिकारी म्हणून अर्जुन झाडे

महाराष्ट्र जीत दिलीप मादाळे

नांदेड जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांची यवतमाळ येथे बदली झाली आहे. तर नांदेड येथे नूतन जिल्हा नियोजन अधिकारी म्हणून अर्जुन झाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील उपसंचालक गट-अ संवर्गातील 14 अधिकाऱ्यांच्या बदल्या 6 जून रोजी राज्य शासनाने केल्या आहेत. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत सुधाकर आडे यांच्या निरोप समारंभ नुकताच घेण्यात आला. यावेळी नुतन जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी निखिल बासटवार, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी मोराळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी प्रभाकर मठपती तसेच जिल्हा नियोजन समितीतील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे हे 19 ऑगस्ट 2020 रोजी जिल्हा नियोजन अधिकारी नांदेड येथे रूजू झाले होते. जिल्हा नियोजन अधिकारी म्हणून त्यांनी कोरोना काळात आरोग्य विषयक बाबींवर जिल्हाधिकारी यांच्यासोबत कोविड सेंटर उभारणे, कोरोना रुग्णांसाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तात्काळ सोयी-सुविधा पुरवण्याच्या कामांना मान्यता देणे व निधी उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी प्राधान्याने केली. जिल्ह्यातील नियोजन विभागात कार्यरत असताना प्रभावी नियोजन, तातडीने निर्णय घेण्याची क्षमता आणि लोकाभिमुख दृष्टिकोन समोर ठेवून उल्लेखनीय कार्य त्यांनी केले.

दरवर्षी जिल्हा नियोजन समितीसाठी शासनाकडून अर्थसंकल्पीत तरतूद100टक्केनिधीखर्चकरण्याचेनियोजनउत्कृष्टरित्याकेलेआहे.

# ११ जून रोजी अडीच हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

महाराष्ट्र जीत

अकोला : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ११ जून रोजी अडीच हजार कोटींहून अधिक किमतीचे जिल्ह्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण होणार आहे. स्थानिक अकोला क्रिकेट क्लब मैदानावर आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घोषणा करतील. पूर्णा नदीवरील काटीपाटी बॅरेज प्रकल्प भूमिपूजन समारंभ(४५४.६२ कोटी), पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला इमारतीचा कोनशिला समारंभ(२४९.४१ कोटी), अकोला महानगरपालिका क्षेत्रांतर्गत केंद्रशासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत मलनिःसारण (टप्पा-१) चे काम भूमिपूजन समारंभ (६२९.०६ कोटी), अकोला महानगरपालिका क्षेत्रांतर्गत प्रधानमंत्री इ-बस सेवा योजना अंतर्गत महापालिकेचा ई-बस डेपो व चार्जिंग स्टेशनचे उभारणी करण्याचे काम भूमिपूजन (१८.९९ कोटी), हायब्रीड अॅन्युटी कार्यक्रम अंतर्गत मूर्तिजापूर-दहीगाव-गुडघी-उमरी-अकोला राज्यमहामार्ग २८४ वरील कि.मी. ०/०० ते ३६/०० महामार्गाची सुधारणा करणे, अकोला मलकापूर-कानशिवनी-मोरगाव काकड-बोरगाव खुर्द जिल्हा प्रमुख मार्ग क्र. १९ वरील कि.मी. ०/०० ते २४/५०० महामार्गाची सुधारणा करणे भूमिपूजन समारंभ (४१०.१० कोटी), हायब्रीड अॅन्युटी कार्यक्रम अंतर्गत उकळी बाजार नेर नांदखेड किनखेड राज्यमहा मार्ग २७८ वरील कि.मी. ६३/०० ते ७९/०० किनखेड ते दहीहांडा महामार्गाची सुधारणा करणे (९७.३७ कोटी), अकोट मतदार संघातील राज्यमार्ग क्र.४७ रावेर, पातुर्डा, पिंपळगाव, खांडवी, जळगाव जामोद, हिवरखेड, अकोट या मार्गावरील (रंभापूर ते हिवरखेड ते वारखेड भाग) साकळी क्र. ११६/६०० ते १५६/००० चे हायब्रीड अॅन्युटी यूटी अतंर्गत (३११.४४ कोटी), अकोला येथे पोलीस अधिकारी कर्मचारी करिता दक्षता नगर येथे २४६ निवास स्थाने व परिसर विकास कामे कोनशिला (१२९.२३ कोटी), अकोला तालुका क्रीडा संकुल बांधकाम कोनशिला समारंभ(५ कोटी), अकोला शहरातील अद्ययावत सांस्कृतिक भवनाचे बांधकाम कोनशिला समारंभ(१५ कोटी) अकोला शहरातील ऑलिम्पिक दर्जाचे जलतरण तलावाचे बांधकाम कोनशिला समारंभ (९.९६ कोटी), अकोला येथे सर्वोपचार रुग्णालयातील नवीन वार्ड इमारतीचे बांधकाम भूमिपूजन समारंभ (१५१.५६ कोटी) बार्शीटाकळी शहरातील मुख्य रस्त्याचे बांधकाम करणे लोकार्पण अकोला तहसील तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोलाचे नवीन प्रशासकीय इमारतीचे काम लोकार्पण समारंभ(१२.०५ कोटी), अकोला येथे महिला व बालविकास भवन इमारतीचे बांधकाम -भूमिपूजन समारंभ (९.९९ कोटी), ३३/११ के.व्ही. हिवरा कोरडे उपकेंद्र ता. मूर्तिजापूर भूमिपूजन समारंभ (३.२० कोटी), ३३/११ के.व्ही. पारद उपकेंद्र, ता. मूर्तिजापूर भूमिपूजन समारंभ(३.२८ कोटी लोकार्पण समारंभ (६.५० कोटी), जिल्हाधिकारी कार्यालय नवीन इमारत लोकार्पण समारंभ (८.२९ कोटी), अकोला शहर व अकोट शहर येथील सीसीटिव्ही प्रकल्प लोकार्पण समारंभ (९ कोटी), बार्शीटाकळी तालुक्यातील भेंडीमहाल गाव येथील सौर प्रकल्प, क्षमता १० मेगा वॅट, वॅट, ३३ के.व्ही. लोकार्पण समारंभ (४५ कोटी), बार्शीटाकळी तालुक्यातील रेडवा गाव येथील सौर प्रकल्प, क्षमता २ मेगा वॅट, ३३ के. व्ही. लोकार्पण समारंभ (९ कोटी), एकूण रक्कम २५८८.०५ कोटी रूपये.

## भाडेवाढ न करता सर्व लोकल करणार एसी

येत आहेत. 'पीक अर्वस'मध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन वेळेत बदल करणे शक्य झाले आहे. परंतु, खासगी आस्थापनात थोडीफार अडचण येत असली तरी त्यावर केंद्र व राज्य सरकार तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आहे, अशी माहिती त्यांनी दिली. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असलेल्या बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात नवीन ५ हजार बसेस उपलब्ध होणार असल्याचे फडणवीस यांनी नमूद केले.

**बंद दरवाजांच्या लोकलमध्ये व्हेंटिलेटरची सुविधा असेल!**

लोकलचे दरवाजे बंद केल्यास लोक गुदमरतील हे आम्हालाही समजते. त्यामुळे लोकलचे दरवाजे बंद असले तरी हवा खेळती रहावी यासाठी दरवाजात व लोकलच्या टपावर व्हेंटिलेटरची सुविधा असणार आहे. असे सांगत फडणवीस यांनी अप्रत्यक्षपणे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना टोला लगावला.

मुंब्रा येथील रेल्वे दुर्घटनेनंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बाहेरून येणारे लोंढे अपघातास कारणीभूत असल्याचा आरोप केला होता. राज ठाकरे यांच्या वक्तव्यावर फडणवीस म्हणाले की, मुंबई आंतरराष्ट्रीय शहर आहे. त्यामुळे मुंबईत येणाऱ्यांची संख्या अधिक असली तरी बाहेरून येणाऱ्या लोंढ्याचे नियोजन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**राहुल गांधी यांनी उत्तर द्यावे!**

विधानसभा निवडणुकीतील निकालात 'फिक्सिंग' असा लेख काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी लिहिला होता. राहुल गांधी यांच्या लेखानंतर महाराष्ट्रातील राजकारण चांगलेच तापले आहे. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, राहुल गांधी यांनी खरे तर निवडणूक आयोगाला पत्र द्यायला हवे होते. तरी मी ६० पानांचे उत्तर दिले असून त्याचे उत्तर राहुल गांधी यांनी द्यावे, असे आवाहन फडणवीस यांनी राहुल गांधी यांना केले.

**पात्र धारावीकरांना मिळणार हक्काचे घर**

धारावीचा पुनर्विकास होऊ नये यासाठी काँग्रेसचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे काँग्रेस आरोप-प्रत्यारोप करत आहे. परंतु, धारावीचा पुनर्विकास हा आमचा संकल्प असून पात्र धारावीकरांना धारावीतच हक्काचे घर मिळणार, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**५५ कोटी जनधन खाती**

मोदी सरकारने गरीब कल्याणाचा अजेंडा राबवला, जनतेला मोफत अन्नधान्य दिले जाते. मोदी सरकार येईपर्यंत नळ जोडणी कमी होती, ती आता १५ कोटींवर गेली आहे. ५२ कोटी लोकांना मुद्रा योजनेचे कर्ज मिळाले आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या मुलांना १४ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. ५५ कोटी जनधन खाती, अन्न सुरक्षा ५१ कोटी, जीवन ज्योती २३ कोटी, आयुष्मान ७७ कोटी खाती तयार केली असून आरोग्य लाभ दिले आहेत. आतापर्यंत मोदी सरकारने महाराष्ट्राला लाभ दिलेला निधी ४३ लाख कोटी रुपयांपर्यंत जात आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**महिलांवर खास लक्ष, माता मृत्यू दर घटला**

नियंत्रणरेषेवर पहिल्यांदा महिलांची तुकडी तैनात करण्याचे काम करण्यात आले आहे. ७३ टक्के घरे महिलांच्या नावावर आहेत. 'लखपती दीदी' ३ कोटी तयार झाल्या आहेत, १ कोटी महाराष्ट्राने बनवण्याचे ठरवले आहे. ९० लाख महिलांचे बचत गट तयार करत त्यांना कार्यरत करण्याचे काम केले आहे. माता मृत्यू दर १६० वरून ८० पर्यंत खाली आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

## ऑस्ट्रियातील शाळेत अंदाधुंद गोळीबार, ९ ठार

त्यांनी लोकांना त्या परिसरापासून दूर राहण्याचा आणि अधिकाऱ्यांच्या सूचनांचे पालन करण्याचा सल्ला दिला आहे.

पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करून माहिती दिली की, शाळा रिकामी करण्यात आली आहे आणि सर्वांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. परिस्थिती नियंत्रणात आहे आणि आता कोणताही धोका नाही. ऑस्ट्रियाच्या ग्राझ शहराची लोकसंख्या सुमारे ३,००,००० आहे. गोळीबारात काही लोक जखमी देखील झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ग्राझ शहराचे महापौर एल्के काहर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये ७ विद्यार्थी आणि शाळेचे कर्मचारी आहेत. शाळेतील गोळीबाराची चौकशी करण्याची जबाबदारी 'स्पेशल टास्क फोर्स'कडे सोपवण्यात आली आहे. ऑस्ट्रियाचे गृहमंत्री देखील ग्राझ शहराकडे रवाना झाले आहेत. पोलिसांनी लोकांना शांत राहण्याचे आणि अफवा पसरवण्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

## मुदा घोटाळ्याप्रकरणी १०० कोटींची मालमत्ता जप्त

'पीएमएलए' कायद्यांतर्गत केली आहे. जप्त करण्यात आलेल्या मालमत्ता या गृहनिर्माण सहकारी संस्था किंवा मुदा अधिकाऱ्यांसह इतर प्रभावशाली व्यक्तींच्या सोईसाठी बनावट असलेल्या व्यक्तींच्या नावावर आहेत.

म्हैसूरच्या लोकायुक्त पोलिसांनी आयपीसीच्या वेगवेगळ्या कलमांतर्गत तसेच १९८८ च्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत सिद्धरामय्या तसेच इतरांविरोधात गुन्हा दाखल केला होता. याच गुन्ह्याची दखल घेऊन ईडीने या कथित घोटाळ्याची चौकशी चालू केली होती. या चौकशींतर्गत आता मुख्यमंत्र्यांची १०० कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

**सिद्धरामय्या यांच्यावरील आरोप**

सिद्धरामय्या यांच्यावर त्यांनी त्यांच्या राजकीय प्रभावाचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर केल्याचा आरोप आहे. 'म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी' अर्थात 'मुदा'ने ३ एकर १६ गुंठे जमीन अधिगृहित केली होती. याच

पान १ वरून

जमिनीच्या बदल्यात सिद्धरामय्या यांनी त्यांची पत्नी बी. एम. पार्वती यांच्या नावे १४ आलिशान साइट्स नावावर करून घेतल्याचा आरोप आहे. मुदाने अधिगृहित केलेल्या जमिनींचे मूल्य हे ३ लाख २४ हजार ७०० रुपये आहे. पण मुदाने भरपाई म्हणून दिलेल्या आलिशान जागांचे मूल्य हे जवळपास ५६ कोटी रुपये आहे, असा दावा केला जातोय. मुदाने केलेल्या याच कथित व्यवहारावर आक्षेप घेण्यात आला होता.

दरम्यान, ईडीच्या या कारवाईनंतर सिद्धरामय्या यांनी प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र आता ईडीच्या कारवाईवर ते नेमकं काय बोलणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. ईडीच्या या कारवाईमुळे कर्नाटकच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

## ...तर पाकिस्तानमध्ये घुसून हल्ला करणार - जयशंकर

केले. त्यामुळे पाकिस्तान गुडघे टेकत शस्त्रसंधीसाठी तयार झाला. राफेल असो की इतर क्षेपणास्त्रे हे किती प्रभावी होते, त्याचा पुरावा पाकिस्तानचे नष्ट झालेले हवाईतळ आहेत.

**कोठेही कारवाई करू!**

एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला कठोर शब्दांत इशारा देताना म्हटले की, पाकिस्तान उघडपणे दहशतवाद्यांना प्रशिक्षण देत आहे. त्यानंतर त्या दहशतवाद्यांना भारतात पाठवत आहे. आता हे आम्ही सहन करणार नाही. आमचा पाकिस्तानला स्पष्ट संदेश आहे. पाकिस्तानने दहशतवादी संघटना आणि दशतवाद्यांना मदत करण्याचे सुरूच ठेवले, तर पाकिस्तानच्या कोणत्या भागात ते दहशतवादी आहेत, त्याचा विचार आम्ही करणार नाही. ते जेथे असतील त्या ठिकाणी जाऊन आम्ही कारवाई करणार आहोत.

## जगभरात पाकिस्तानचा बुरखा फाडला!

अनेक विद्यमान खासदार, माजी खासदार, माजी राजनैतिक अधिकारी आदींचा समावेश होता.

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी यापूर्वीच या शिष्टमंडळाची भेट घेतली व पाकपुरस्कृत दहशतवादाविरोधात त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

यातील चार शिष्टमंडळाचे नेतृत्व सत्तारूढ आघाडीतील खासदारांनी केले. ज्यात भाजपचे दोन, जदयूचा एक, शिवसेनेच्या एका खासदाराचा समावेश होता, तर तीन शिष्टमंडळाचे नेतृत्व विरोधी पक्षांच्या खासदारांनी केले. ज्यात काँग्रेस, द्रमुक व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आदींचे एक-एक खासदार सामील होते.

## रेल्वे दुर्घटनेचे कारण गुलदस्त्यातच

गंभीर असलेल्या दोन प्रवाशांपैकी एका प्रवाशाच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाल्याने त्याचे व्हेंटिलेटर काढण्यात आले आहे. तर एक प्रवासी अद्यापही व्हेंटिलेटरवर असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्याने सांगितले.

लोकलमधून ८ प्रवासी रेल्वे रूळांवर पडले. त्यापैकी ४ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तर जखमी झालेल्या ५ प्रवाशांना ठाणे स्थानकात उतरवून रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेनंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासामध्ये ६ प्रवासी कसारा, तर २ प्रवासी कर्जत लोकलमधून पडल्याचे समोर आले आहे. घटनास्थळी रेल्वे रूळाला सुमारे २.५ अंशाचे वळण असून यामुळे दुर्घटना झाली नसल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## 'एकच प्याला' महागला

येत असलेल्या चांगल्या पद्धतींचा, धोरणात्मक बाबींचा अभ्यास करुन शासनास शिफारशी व अहवाल सादर केला. त्यानुसार ही वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

उत्पादन शुल्क व दारू विक्रीच्या करातून राज्याला सध्या वर्षाला सरासरी २५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळतो. नव्या दरवाढीमुळे हा महसूल ४० हजार कोटींच्या घरात जाईल, असा विश्वास राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्याने व्यक्त केला.

**अनुज्ञप्ती व्यवस्था भाडेतत्त्वावर**

राज्यात मद्य विक्री अनुज्ञप्ती (एफएल-२) व परवाना कक्ष हॉटेल / रेस्टॉरंट अनुज्ञप्ती (एफएल-३) कराराद्वारे भाडेतत्त्वावर चालविता येणार आहे. त्याकरिता वार्षिक अनुज्ञप्ती शुल्काच्या अनुक्रमे १५ टक्के व १० टक्के अतिरिक्त शुल्क आकारण्यात येईल. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बळकटीकरणासाठी ७४४ नवीन पदे व पर्यवेक्षीय स्वरूपाची ४७९ पदे अशी १,२२३ पदे निर्माण करण्यात येणार आहेत.

**उत्पादन शुल्कात वाढ**

भारतीय बनावटीच्या विदेशी मद्यावरील (आयएमएफएल) उत्पादन शुल्क निर्मितीमूल्याच्या ३ पटवरून ४.५ पट करण्यात येणार आहे. देशी मद्यावर उत्पादन शुल्क प्रति लिटर १८० रूपयांवरून २०५ रूपये करण्यात आले आहे.

**'एआय' आधारित नियंत्रण प्रणाली**

उत्पादन शुल्क विभागाच्या नियंत्रण यंत्रणेला बळकटी देण्यासाठी 'एकात्मिक नियंत्रण कक्ष' स्थापन करण्यात येणार असून, यामार्फत राज्यातील मद्यनिर्मिती केंद्रे, घाऊक विक्रेते यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीद्वारे नियंत्रण केले जाणार आहे.

**विभागीय विस्तार**

मुंबई शहर व उपनगरांसाठी नवीन विभागीय कार्यालय तर ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर यासारख्या जिल्ह्यांसाठी नवीन अधीक्षक कार्यालये स्थापन होणार आहेत.

## नगरविकास विभागाकडून प्रभाग रचनेचे आदेश

आदेश जारी करण्यात आले आहेत.

७ मार्च २०२२ रोजी मुंबईतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्यानंतर ८ मार्च २०२२ पासून मुंबई महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू आहे, मात्र ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने पुढील चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या, असे आदेश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या कामाची तयारी सुरू केली आहे. निवडणूक आयोगाने नगरविकास विभागाला प्रभाग रचनेचे आदेश दिले होते. त्यानुसार मंगळवारी नगरविकास विभागाने २९ महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद याठिकाणी प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले.

**प्रभाग रचनेच्या कामासाठी अडीच महिने लागणार**

प्रभाग रचनेचे काम पूर्ण करण्यासाठी अडीच महिन्यांचा कालावधी लागणार असून त्यानंतर हरकती, सूचना मागवण्यात येणार आहेत. मुंबई महानगरपालिका आयुक्त तर जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी हरकती, सूचनांवर सुनावणी घेतील. त्यानंतर अंतिम प्रभाग रचना यादी निवडणूक आयोगाला सादर करतील, असे निवडणूक आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

**चार सदस्यीय प्रभाग रचना**

महायुती सरकारच्या काळात ८ सप्टेंबर २०२२ च्या अधिनियमानुसार अ, ब व क महापालिकांना चार सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. या महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तिथे चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील, अशी तरतूद करण्यात आली आहे. या महापालिकांत पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण-डोंबिवली या महापालिकांत चार सदस्यीय प्रभाग रचना लागू करण्यात आल्या आहेत.

राज्यातील १९ 'ड' वर्ग महापालिकेसाठी प्रभाग रचनेचे आदेश जारी करण्यात आले असून या प्रभाग रचनेची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर असणार आहे. या महापालिकांमध्ये उल्हासनगर, पनवेल महापालिकेचा समावेश आहे.

## भारतासह जगभरात 'चॅटजीपीटी' बंद

नव्हे, तर जगभरातून या तक्रारी येत होत्या.

**तक्रारींची दखल**

महत्त्वाचे म्हणजे 'ओपन एआय'नेही या तक्रारींची दखल घेतली असून यासंदर्भात निवेदन जारी केले. 'काही युजर्सना चॅटजीपीटी वापरण्यास अडचणी येत असल्याचे आमच्या निर्दशनास आले आहे. आम्ही याची दखल घेतली असून ती सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत', अशी प्रतिक्रिया 'ओपन एआय'कडून देण्यात आली आहे.

**कामे रखडली**

दरम्यान, 'चॅटजीपीटी' बंद पडल्याने अनेकांनी सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली आहे. शैक्षणिक तसेच इतर कामांसाठी 'चॅटजीपीटी'चा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. त्यामुळे त्यांची कामे रखडली असल्याची तक्रार सोशल मीडिया युजर्सनी केली आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# ट्रक अपघातात वृद्ध गंभीर जखमी

## कारंजा बायपास वरील झाशी राणी चौकातील घटना,

महाराष्ट्र जीत

**कारंजा... दिनांक 10**

कारंजा येथिल झाशी राणी चौक येथे ट्रक अपघातात 60 वर्षीय वृद्ध गंभीर जखमी झाले. ही घटना मंगळवार 10 जून रोजी सकाळी 10 वाजता कारंजा बायपास परिसरातील झाशी राणी चौकात घडली. मिळालेल्या माहिती नुसार उद्धवराव महादेव पाचडे वय 60 वर्ष असे जखमीचे नाव असून ते शहरातील तुषार कॉलनीतील रहिवाशी आहे, भाजीपाला खरेदी करण्याकरिता झाशी राणी चौकात असलेल्या भाजीपाला बाजाराजवळ आले होते.काम आटोपल्यानंतर बाहेर



उभी केलेली स्कूटी काढीत असताना ते एम एच 29 बी डी 4456 क्रमांकाच्या ट्रकच्या चाकात आले.त्यामुळे त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर इजा झाली.घटनेनंतर त्यांना उपचारासाठी कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.परंतु उपचारादरम्यान त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आल्याने त्यांना पुढील उपचाराकरिता अकोला येथे पाठविण्यात आल्याची माहिती रुग्णालयातील नोंदीवरून प्राप्त झाली आहे. या घाशीरानी चौकामध्ये यापूर्वी एका विद्यार्थिनीचा अपघातात मृत्यू झाला होता त्यानंतरही पोलीस प्रशासनाकडून कुठलीही दखल घेतली गेली नाही त्यामुळे दिनांक 10 जून रोजी एका वृद्ध साठ वर्ष इसीमाचा अपघात होऊन त्यांचे दोन्ही पाय गंभीरित्या जखमी झाले आहे त्यामुळे कारंजा शहरातील ट्रॅफिक पोलिसांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे, कारण या चौकात पोलिस चौकी असून नेहमी गर्दी राहते म्हणून वाहतुक पोलीस हजर असणे गरजे चे आहे.

**झाशी राणी चौकातील लघु व्यावसायिकांना इतरत्र हटविण्याची मागणी..**

बायपास वरील झाशी राणी चौकात रस्त्यावर आंबा विक्रेते आणि इतर लघु व्यावसायिक मोठ्या प्रमाणात असल्याने ग्राहकांची खरेदीसाठी गर्दी होते.शिवाय ग्राहक आपल्या दुचाक्या रस्त्यावर उभ्या करीत असल्याने मोठ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होते.मंगळवारी झालेला अपघात सुद्धा याच कारणामुळे झाला.त्यामुळे येथील लघुव्यवसायिकांना इतरत्र जागा देण्यात यावी अशी मागणी घटनेवेळी उपस्थित नागरिकांकडून केल्या गेली. घटना घडल्यानंतर पोलिस विभागाकडून रत्यावरील भाजी विक्रेते आणि आंबा विक्रेते यांना झासी राणी चौकातून हद्दपार करीत ऑप्रेशन राबविले गेले त्यात वाहतूक विभागाचे शहर प्रमुख पोलिस उपनिरीक्षक महेश नेहारे यांनी अपघातानंतर जनभावना लक्षात घेता अधिक सक्तीचे निर्णय घेत भाजी विक्रेते आणि आंबा विक्रेते यांना झासि राणी चौकातून उधाविले त्यात कारंजा पोलिस विभागाचे उपविभागीय अधिकारी पाडवी पोलीस निरीक्षक शुक्ला याचे मार्गदर्शनात ही कार्यवाही केली असून ही किती दिवस कायम राहते हे पाहणे ओट्सुकाचे राहणार आहे .

## भोकर तालुक्यात मृग नक्षत्रात

### शेतकऱ्यांनी केली खरीप पिकाच्या लागवडीस सुरुवात

भोकर / उत्तम कसबे

तालुक्यातील शेतकऱ्यांनी मृग नक्षत्राचा मुहूर्तावर खरीप पिकाच्या लागवडीला सुरुवात केली आहे . बाजारातील महागडे बिबियाणे रासायनीक खते शेतकरी वर्ग यांनी घेतली आहे . निसर्गावर अवलंबुन असलेले कोरडवाहु जमीनदार शेतकरी यांनी कापुस लागवड सोयाबीन पेरणी उडीद मुग पेरणी करण्यासाठी मे महिन्याच्या अखेरच्या आठवडयात अवकाळी पावसाने हजेरी लावली जुन महिन्यात ही एक दोन दिवसात पाऊस झाला त्यामुळे शेतकरी यांनी विलंब न लावता वेळेवर अनेक शेतकऱ्यांनी खरीप पिकाची लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे . ग्रामीण पेरणीच्या कामाला मजुरदार मिळत नाही . शेतकरी वर्ग लागवड करण्यासाठी घाईगडबड करत असतानाचे चित्र दिसून येत आहे . पेरणीपूर्व पाऊस पडावा तेवढा पाऊस पडल नाही . जमीनीची धुप गेली नाही . वेळेवर पाऊस पडला बिबियाणे उगवेल .



## विद्युत खांबावर चिंचेचे झाड कोसळल्याने सोनापुर येथील विद्युत पुरवठा व पाणीपुरवठा बंद.

**सुदर्शन गोवर्धन**
**महाराष्ट्र जीत**
**तालुका प्रतिनिधी सावली**

सावली :सावली तालुक्यातील पूर्वेस सोनापुर या गावात दि.09/06/20250मंगळवारला रात्रीच्या सुमारास तुफान वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. या पावसामुळे अनेक भागांमध्ये हाहाकार माजला असून, नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे अनेक घरांवरील पत्रे ,कवेलू उडाले. आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे महावितरणच्या अंदाजे 2 विद्युत खांबावर वादळी पावसामुळे चिंचेचे भले मोठे झाड पडल्याने गावांमध्ये वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.सदर घटना ही रात्रौ घडल्याने यात सुदैवाने कुठलीही जिवितहानी झाली नाही.वादळी वाऱ्याच्या जोरामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोनापुर येथील सर्व नागरिकांनी रात्र विजेविना अंधारात काढली असून, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

**"प्रशासनाकडून पंचनाम्याची तयारी"**

सदर पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती प्रशासनाकडे पोहोचवण्यात आली असून, तहसील व महसूल प्रशासनाने पंचनाम्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. घरांचे नुकसान, शेतीवरील परिणाम, आणि वीज खांबांच्या कोसळण्यामुळे झालेल्या अडचणी यांचा आढावा घेण्यात येत आहे.

**"हवामान खात्याचा पुढील इशारा"**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील दोन दिवस9जुन ते 10जून जिल्ह्यात वादळ वाऱ्यासह पाऊस येण्याची परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.

## वटसावित्री पौर्णिमा निमित्य वडाची पूजा करणाऱ्या महिलावर मधमाशांचा हल्ला,

### अनेक महिला सह पुरुष जखमी,

महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर :- सुभाष खडसे**

**श्रीक्षेत्र माहूर :-** परंपरेप्रमाणे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माहूर शहरात भाविक महिला कडून वटसावित्री पौर्णिमा निमित्त वटवृक्षाला प्रदक्षिणा घालून वटसावित्री पौर्णिमा साजरी करत असताना वटवृक्षावरील मोहळ उठल्याने हजारो मधमाशांनी अचानकपणे महिला व रस्त्यावरून जाणाऱ्या पुरुषावर हल्ला करून अनेक महिलांना गंभीर जखमी केल्याची घटना दि,१०जुन रोजी दुपारी ३=०० वाजता वार्ड क्रमांक ५ मधील हनुमान मंदिराजवळील वटवृक्षाच्या पायथ्याशी असलेल्या पारावर घडली आहे, परंपरेप्रमाणे दरवर्षी वार्ड क्रमांक पाच मधील हनुमान मंदिरा वरील पारावर शेकडो महिला दिवसभरात येऊन वटसावित्री पौर्णिमा साजरी करीत असतात सकाळी ११=२५ मिनिटांनी मुहूर्त असल्याने महिलांनी तोबा गर्दी केली होती, तसेच येणाऱ्या प्रत्येक भाविक महिलांनी अगरबत्ती धुप लावून नारळ अर्पण करत वटवृक्षाला सात प्रदक्षिणा घालून मनोभावे पूजा अर्चा सुरू केली होती, दुपारी तीन वाजता अगरबत्ती धूप चा धूर जास्त झाल्याने शेजारीच झाडावर असलेल्या मोहळातील मधमाशांनी अचानकपणे येथे आलेल्या महिलावर



हल्ला चढवला, यामध्ये सौ चंदा दिलीप पांडे, वय ६५राहणार ब्राह्मण गल्ली माहूर आणि रस्त्यावरून चाललेले विलास मोतीराम पवार वय ४५वर्षे राहणार बंजारा तांडा माहूर यांच्यावर शेकडो मधमाशांनी हल्ला करत कडाडून चावे घेतले, त्यामुळे दोघेही बेशुद्ध पडले तर अनेक महिलांना मधमाशांनी चावा घेतल्याने महिलांनी तेथून पळ काढला, घटना पाहून अनेकांनी आपल्या वाहनाद्वारे दोघांना ग्रामीण रुग्णालयात आणण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या मागेही मधमाशा लागल्याने त्यांनी कसेबसे ग्रामीण रुग्णालय गाठले येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ किरण वाघमारे यांनी जखमीवर उपचार केले

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दारव्हा येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे

राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिग्रस-दारव्हा-नेर विधानसभा मतदारसंघात आरोग्य संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रविवार दि.१५जून २०२५ रोजी दारव्हा येथील नगर परिषद शाळा क्र २. दारव्हा येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मोफत रोग निदान, शस्त्रक्रिया, उपचार व औषध वाटप शिबिर होणार आहे. माँ आरोग्य सेवा समिती, यवतमाळ, तथा दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रूग्णालय, सावंगी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या या आरोग्य संकल्प शिबीरात रक्तदाब, आजार, कर्करोग, किडनीचे हृदयरोग, नेत्ररोग, हायड्रोसिल, हर्निया, पोटाचे मूळव्याध, विकार, थायरॉईड, स्तनाचा कर्करोग, मासिक पाळीतील आजार, अस्थिरोग, कान-नाक-घसा, श्वसन रोग, दंत रोग, मेंदूविकार, मानसिक रोग, बालरोग आदींची मोफत तपासणी, रोगनिदान 'उपचार, शस्त्रक्रिया व औषधी वाटप करण्यात? येणार आहे. या शिबीरात नामांकीत तज्ज्ञ डाक्टरांकडून तपासणी करण्यात येणार आहे. स्तनांच्या कर्करोगासंदर्भात



मेमोग्राफी तपासणी, प्लास्टिक सर्जरी, वंधत्व समुपदेशन, व्हेरिकोज व्हेन तपासणी करण्यात येणार आहे. भरती केलेल्या रूग्णांच्या आवश्यक चाचण्याही मोफत करण्यात येणार आहे. या शिबिरात सहभागी रूग्णांना अतिविशेष उपचार व सुविधाही मिळणार आहेत. रूग्णांची नोंदणी शिबिर स्थळावरच केली जाणार आहे. आरोग्य तपासणी शिबिरात येताना रूग्णांनी आधारकार्ड, रेशनकार्ड आणावे. तसेच मा. पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्य आरोग्य शिबीर स्थळी रक्तदान शिबीराचे सुद्धा आयोजन केले आहे. या शिबिरात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी व्हावे असे आव्हाहन शिवसेना दारव्हा तथा आयोजकांनी केले आहे..

# विजयासाठी पक्ष सिस्त ठेवत बूथ सेक्टर मित्याची बांधणी करा.राजेंद्र कांबले.

महाराष्ट्र जीत

वाशिम जी. प्र. जिल्हा परिषद, पंचायत समिती ,नगर पंचायत, नगरपरिषद निवडणुका बसपा स्वबळावर लढणार असून येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका बहुजन समाज पार्टी स्वबळावर लढणार आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी बूथ सेक्टर बांधणी करावी असे आव्हान बसपाचे पश्चिम विदर्भ मुख्य झोन प्रभारी राजेंद्रजी कांबळे यांनी स्थानिक सर्किट हाऊस येथील कार्यकर्ता बैठकीत केले बहुजन समाज पार्टी वाशिम जिल्ह्याची बैठक सोमवारी शासकीय विश्रामगृह येथे संपन्न झाली यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मुख्य झोन प्रभारी राजेंद्र कांबळे बोलत होते ते पुढे म्हणाले राज्यात दलित आदिवासी समाजावरील अत्याचार वाढले आहेत





सत्ताधारी आणि विरोधक हे प्रस्थापितांच्या बाजूने आहेत यावर एकच उपाय आहे तो म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणाऱ्या बहुजन समाज पार्टी ला समाजाने मजबूतपणे साथ दिली पाहिजे यावेळी जिल्हाध्यक्ष अड. राहुल गवई यांनी प्रस्ताविक केले त्यांनीआपल्या भाषणामध्ये असे म्हटले की आपण स्वतःला आंबेडकरवादी समजतो परंतु काम मनुवादी पक्षाचे करतो हे थांबवा हे मनुवादी पक्ष आपला वापर करतात यासाठी बहन कुमारी मायावती जी यांचे हात बळकट करण्यासाठी एक नेता व निळा झेंडा आणि हत्ती निशाणी शिवाय अन्य पर्याय नाही यासाठी प्रत्येक घरात हा संदेश पोहोचवण्यासाठी प्रमाणिकपणे प्रयत्न करा असे आवाहन केले आहे तसेच जिल्हा प्रभारी भाऊराव वासनिक यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अड. संघनायक मोरे यांनी केले तर आभार जिल्हा प्रभारी प्रकाश आठवले यांनी केले. या बैठकीत जिल्हा उपाध्यक्ष रुपेश वानखेडे जिल्हा महासचिव संतोष वाठोरे मोहन खिराडे उमेश जाधव अश्विन वाघमारे राहुल मैदकर पवन कुमार कदम विनोद सोनवणे दीपक वानखडे बबलू दादा वाहने राहुल इंगळे मनोज राऊत प्रदीप मैंदकर धीरज मैदकर संतोष मैदकर स्वप्निल मैदकर, विलास मैदकर, सुजात पाटील .रुस्तुम वानखडे, अनिल भगत, कैलास कांबळे, भारत सावळे, जगन्नाथ मैदकर, प्रजल मैदकर, संतोष शृंगारे, सुमेध राऊत, कमल राठोड, अभिषेक राऊत, इत्यादी कार्यकर्ते हजर होते तसेच अश्विन वाघमारे वाशिम शहराध्यक्ष व जगन्नाथ मैदकर यांना रिसोड विधानसभा संयोजक व मनोज राऊत वाशिम तालुका अध्यक्ष पदी नियुक्तीपत्र दिले...तसेच कार्यक्रम यशस्वी करण्याकरता सर्व विधानसभा जिल्हा कमिटी आणि शहर कमिटी यांनी सहकार्य केले..

## माहूर तालुक्यातील रेशनधारकांना मिळणार तीन महिन्याचे एकाचवेळी धान्य,

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे

श्रीक्षेत्र माहूर तालुक्यातील रेशन धारकांना आता मिळणार तीन महिन्याचे एकाचवेळी धान्य, जून,जुलै,ऑगस्ट या तीन महिन्याचा साठा माहूर सह तालुक्याला प्राप्त झाला असून स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वाटपाचे आदेश देण्यात आले आहे,पहिल्यांदाच अडव्हान्स धान्य देण्याचा शासनाने निर्णय घेतल्यामुळे रेशन कार्ड धारकाकडून आश्चर्य व्यक्त होत आहे, अंत्योदय गट तर प्राधान्य गटात या सर्वांना शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून धान्य उपलब्ध करून दिल्या जाते, यामध्ये अंत्योदय धारकांना 25 किलो तांदूळ 10 किलो गहू असे 35 किलो धान्य दिले जाते, तर प्राधान्य गटाला प्रति व्यक्ती 2 किलो गहू आणि 3 किलो तांदूळ असे 5 किलो धान्य दिले जात आहे, आतापर्यंत तब्बल एक महिना उशिरा मिळणारे धान्य चक्क पुढील तीन महिन्याचे अडव्हान्स मध्ये एकत्र मिळणार आहे, म्हणजेच अंत्योदय धारकांना जूनमध्ये 105 किलो तर प्राधान्य गटाला प्रतिव्यक्ती 15 किलो धान्य मिळेल, पुरवठा विभागाला तीन महिन्याचा धान्य पुरवठा प्राप्त होताच तो रेशन दुकानदारांना पाठविला आहे, त्यामुळे ला भार्थ्यांना रेशन दुकानातून एकत्र तीनही महिन्याचे धान्य नेता येणार आहे, दुकानांमध्ये तीन महिन्याचा साठा पाठविण्यात आला आहे, काही ठिकाणी धान्याचे वाटप सुरू झाले असून काही ठिकाणी मात्र पॉस मशीनवर धान्य अपलोड होण्याची प्रतीक्षा रेशन दुकानदार करीत आहे,

# बिबट्याच्या हल्ल्यात तीन दिवसांत गाई-म्हशीचे वासरु व रेडा ठार; पशुपालक शेतकरी प्रचंड दहशतीखाली

## नुकसानभरपाई देऊन वनविभागाने तत्परतेने बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी

महाराष्ट्र जीत

महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे

श्रीक्षेत्र माहूर : तालुक्यातील गुंडवळ येथील अल्पभूधारक महिला शेतकरी रमाबाई वसंता कांबळे यांनी माहूर शहरालगतच्या जमदग्नी ऋषि खोरीजवळील आपल्या शेतातील गोठ्यात दि.०६ जूनच्या रात्री बांधून ठेवलेल्या गाईच्या वासरावर बिबट्या ने हल्ला चढवून ठार केल्याची घटना ताजी असतानाच तीसऱ्याच दिवशी लिंबायत येथील अल्पभूधारक शेतकरी अनिल गोपालसिंह चुंगडे यांच्या चक्क गावातील घराशेजारील गोठ्यात बांधून असलेल्या दुभत्या म्हशीच्या रेड्यास (नर पिल्लू) बिबट्याने हल्ला करून बाजूच्या उसाच्या फडात उचलून फरफटत नेत फस्त करुन ठार केल्याची आणखी एक सणसणीखेज घटना दि.०९ जूनच्या रात्री घडल्याने पशुपालक शेतकऱ्यांसह ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. भौगोलिकदृष्ट्या उंच पहाडी,दुर्गम डोंगराळ माहूर तालुक्यात जसजसा उन्हाळा अंतिम टप्प्यात येतोय अन् पावसाळ्याची चाहूल लागतेय नैसर्गिक पानझडी मुळे जंगल ओसाड पडतायेत, परिणामी आपले भक्ष शोधन्यासाठी हिंस्त्र वन्यप्राणी देखील शेत-शिवारातील गोठ्यासह गावाकडे देखील





आपला मोर्चा वळवत असल्याचे दि. ९ रोजी लिंबायत (जूने) येथील अनिल चुंगडे यांनी आपल्या गावातील घराशेजारील गोठ्यात रात्री नेहमीप्रमाणे बांधून ठेवलेल्या दुभत्या जनावरांपैकी म्हशीच्या एका नर पिल्यावर (रेडा) हल्ला करून ठार केल्याच्या खळबळजनक घटनेवरून उघड झाले आहे. विशेष म्हणजे बाजूलाच बांधून असलेल्या तीन म्हशी व त्यांचे दोन रेडकूंवर बिबट्याने हल्ला केला नसल्याने त्यांचा जीव वाचला तर पशुपालकाचे आणखी मोठे आर्थिक नुकसान होण्यापासून वाचले.

लिंबायत (जूने) येथील अनिल चुंगडे हे अल्पभूधारक शेतकरी आपल्या चार एकर शेतजमीनीवर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. शेतीसह जोडधंदा म्हणून ते दुभत्या म्हशी व बकऱ्यांचे पशुपालन देखील करतात. दि. ०९ जून रोजी रात्री त्यांनी गोठ्यात आपल्या तीन दुभत्या म्हशी व त्यांचे तीन रेडकू बांधून ठेवले होते. सकाळी दुभत्या साठी गेले असता तीनपैकी एक रेड गोठ्यात दिसून न आल्याने त्यांनी शोधाशोध केली असता, बाजूच्या उसाच्या शेतात सदरील तीन ते चार महिन्याचा रेडा अर्धवट खाल्लेल्या मृतावस्थेत पडून असल्याचे त्यांना दिसून आले. बिबट्याने सदरील रेडा ठार केल्याने चुंगडे यांच्या म्हशीने दुभते थांबवले असल्याने पशुपालक शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. वनविभागाला घटनेची माहिती देण्यात आली असून, वन्यप्राण्याच्या हल्ल्यात ठार झालेल्या पाळीव प्राण्याची नुकसानभरपाईची मागणी आपत्तीग्रस्त पशुपालक शेतकरी अनिल चुंगडेसह उपसरपंच सुनील चुंगडे यांनी वनविभागाकडे ऑनलाईन व ऑफलाइन अर्जाद्वारे केली असून, वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव यांनी तीन दिवसांत दोन वेगवेगळ्या ठिकाणी शेतकऱ्याच्या बहुमूल्य पशुधनावर हल्ला करून ठार मारणारा बिबट्या एकच कि, अनेक याचा तातडीने शोध घेऊन सदरील पाळीवप्राणीखोर बिबट्याचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी प्रचंड दहशतीखाली वावरत असलेल्या पशुपालक शेतकऱ्यांमधून होत आहे.

## अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळा कोटग्याळ येथे जल्लोषात साजरा

### सैनिक श्रीरामे यांचा गावकऱ्यांच्या वतीने आ. डॉ. राठोड यांच्या उपस्थितीत नागरी सत्कार

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत दिलीप मादाळे**

मुखेड तालुक्यातील मौजे कोटग्याळ येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या जल्लोष मध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मोत्सव सोहळा आनंदाने साजरा करण्यात आला. यावर्षी विशेष म्हणजे त्रिशताब्दी अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव असल्यामुळे गावातील तरुणाईला आकर्षक म्हणून मुखेडचा डीजे वाला माध्यमातून गाजावाजा नृत्य करत मंत्रमुक्त आनंदमय सोहळा तरुणाईने गाजवला . यावेळी गावातील भूमिपुत्र सैनिक बजरंग श्रीरामे यांचा स्थानिक आ. डॉ. तुषार राठोड यांच्या उपस्थितीमध्ये व प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक संघटना तालुका प्रमुख ज्ञानेश्वर डुमणे, गावकऱ्यांतर्फे नागरी सत्कार सोहळा पार पडला, विशेष अतिथींचा मान सन्मान करण्यात आला. यावेळी सकाळच्या सत्र मध्ये भव्य दिव्य तेल चित्र अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेसमोर पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले, यावेळी सार्वजनिक अहिल्या महोत्सव 2025 चे अध्यक्ष गोविंद मारोती पाटील उपस्थित होते, यावेळी पिवळा पताका ध्वजारोहण गावातील ज्येष्ठ नागरिक तथा पोलीस पाटील मारोती गोविंदराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले,सरपंच बालाजी आनंदराव पाटील, नारायणराव सादगीर, शिवाजी पाटील, दिगंबर पाटील ,बालाजी सादगीर, मारुती श्रीरामे, भगवान श्रीरामे, दिलीप श्री रामे ,चंद्रकांत कोकाटे, अरविंद पाटील, ज्ञानेश्वर कुंडगीर, मस्के, कोकाटे सर्व युवा तरुण ,भूमिपुत्र सैनिक बजरंग श्रीराम यांचे कुटुंब, सर्व जयंती मंडळ गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते, यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.




मुखेडच्या डीजे वाला या माध्यमातून नृत्यांमध्ये तरुणाई मंत्रमुक्त झाली, अतिशय थाटामाटात गावभर ट्रॅक्टर वर अहिल्यादेवी होळकर यांचा फोटो ठेवून मिरवणूक डीजेच्या तालावर भव्य दिव्य पार पडली.

दैनिक **महाराष्ट्र जीत**

बुधवार दिनांक 11 जून 2025

**वाशीम जिल्हा**



## विद्युत खांबावर चिंचेचे झाड कोसळल्याने सोनापुर येथील विद्युत पुरवठाव पाणीपुरवठा बंद.

**सुदर्शन गोवर्धन**
**महाराष्ट्र जीत**
**तालुका प्रतिनिधी सावली**

सावली :सावली तालुक्यातील पूर्वेस सोनापुर या गावात दि.09/06/20250मंगळवारला रात्रीच्या सुमारास तुफान वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. या पावसामुळे अनेक भागांमध्ये हाहाकार माजला असून, नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे अनेक घरांवरीलपत्रे ,कवेलू उडाले. आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे महावितरणच्या अंदाजे 2 विद्युत खांबावर वादळी पावसामुळे चिंचेचे भले मोठे झाड विद्युत खांबावर पडल्याने गावांमध्ये वीज पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.सदर घटना ही रात्रौ घडल्याने यात सुदैवाने कुठलीही जिवितहानी झाली नाही.वादळी वाऱ्याच्या जोरामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोनापुर येथील सर्व नागरिकांनी रात्रभर विजेविना अंधारात काढली असून, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

**"प्रशासनाकडून पंचनाम्याची तयारी"**

सदर पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती प्रशासनाकडे पोहोचवण्यात आली असून, तहसील व महसूल प्रशासनाने पंचनाम्याची प्रक्रिया लवकरच सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. घरांचे नुकसान, शेतीवरील परिणाम, आणि वीज खांबांच्या कोसळण्यामुळे झालेल्या अडचणी यांचा आढावा घेण्यात येत आहे.

**"हवामान खात्याचा पुढील इशारा"**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील दोन दिवस9जुन ते 10जून जिल्ह्यात वादळ वाऱ्यासह पाऊस येण्याची परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.



# ठाणे महानगर पालिकेच्या दिवा प्रभाग समिति क्षेत्रात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट...!

## क्लस्टर योजना ही निवडणुकीपूर्वीची बूस्टर योजना ?

महाराष्ट्र जीत

प्रतिनिधी (नागेश पवार)

ठाणे - दिवा जंक्शन हे तसे गोरगरीब, कष्टकरी, चाकरमण्यांच्या गरजेपोटी वसलेले, विशेषतः मुंबईतून बाहेर फेकल्या गेलेल्या नागरिकांना परवडणाऱ्या बैठ्या चाळींसाठी ओळखले जात असे. कालांतराने मुंबईतील बहुतांश गरीब विस्थापित दिवा येथे येऊन आपल्या हक्काचे परवडणारे आश्रय शोधू लागल्यानेच येथे मोठ्या प्रमाणात नागरिकीकरण झाले. तर आता शहरात असलेल्या १५/२० वर्ष जुन्या बैठ्या चाळी तोडून त्याच ठिकाणी पुन्हा नव्याने ६/७ माजल्यांच्या अनधिकृत ईमारती उभारल्या जात असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ड्रीम प्रोजेक्ट म्हटली जाणारी "क्लस्टर योजना ही फक्त निवडणुकी पूर्ती दिवेकरांना देण्यात आलेली बूस्टर योजना" होती



की काय असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. जी योजना आता फक्त कागदावरच राहणार ? मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन सारख्या महत्वपूर्ण प्रकल्पाचे ठाणे जिल्ह्यातील स्थानक हे दिवा शहरा लगत असल्याने, आपल्या हक्काचे घर घ्यायचे स्वप्न उराशी बाळगून असणाऱ्यांनी आता आयुष्यभराची जमापुंजी ह्या अवैध बांधकामांमध्ये गुंतवायला सुरुवात केली असून अवघ्या ४ महिन्यांमध्ये हे भुमाफिया तळ+७/८ मजली ईमारत उभारत असून हे अतिशय धोकादायक व प्राणघातक ठरू शकते. सन २०१३ मध्ये शीळ-डायघर लक्की कंपाऊंड येथे तळ+७ मजली अवैध ईमारत पत्त्यांसारखी कोसळली, ज्यात १८ लहान मुलांसह ७४ निष्पाप बळी गेल्यावर प्रशासन खडबडून जागे झाले होते. भाजपा चे ठाणे शहर आमदार संजय केळकर यांनी अनधिकृत बांधकामांबाबत अनेकदा अधिवेशनात आवाज उठवला तर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील येथून पुढे नव्याने सुरु होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना तत्परतेने फुटिंग वरच जमीनदोस्त करण्यात यावेत असे आदेश पालिका प्रशासनाला दिले. परंतु पालिका प्रशासनाच्या अतिक्रमण विभागाकडून ह्या अतिक्रमणांवर कोणतीही ठोस नव्हे तर थातूर मातूर कारवाई देखील केली जात नसल्याने भुमाफिया फोफावले आहेत. पालिका अधिकारी कुठवर झोपेचे सोंग घेणार ? लक्की कंपाऊंड सारख्या दुर्घटने नंतरच नव्याने सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणार का ? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

## नियोजन भवन, चंद्रपूरचंद्रपूर जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न ; खासदार डॉ. नामदेव किरसान यांची उपस्थिती

चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अशोक ऊईके यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा नियोजन समितीची" बैठक नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे पार पडली. या बैठकीत विविध विकास कामांचा आढावा घेण्यात आला. खासदार डॉ. किरसान यांनी बैठकीत विविध विषयावर आपले मत मांडले दरम्यान वन्य प्राण्यांचे वाढते हल्ले कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली, त्याचबरोबर वन्य प्राण्यांच्या हल्ल्यातील मृतक व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्याला नोकरी देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी खासदार प्रतिभाताई धानोरकर, आमदार विजय भाऊ वडेट्टीवार, आमदार श्री. सुधाकर अडबाले, आमदार श्री. अभिजीत वंजारी, आमदार श्री. किशोर जोरगेवार, आमदार श्री करण देवतळे, आमदार श्री. किर्तीकुमार भांगडीया, आमदार श्री. देवराव भोंगडे, , जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पुलकित सिंग, पोलीस अधिक्षक मुमुक्का सुदर्शन आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




## कल्याण ते कर्जत लोकल फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची विशाल वाघ यांची मागणी



लोकल वेळेवर न येणे, फेऱ्या कमी असणे व प्लॅटफॉर्मची उंची कमी असणे, इंडिकेटर खराब असणे अशा अनेक समस्या मध्य रेल्वेच्या वाढत चालल्या आहे असा आरोप समाजसेवक विशाल वाघ यांनी केला आहे. लोकल फेऱ्या कमी प्रमाणात असल्याने, लोकलमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. नुकतेच घडलेल्या दिवा मुंब्रा सारखी दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता लवकरात लवकर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ करावी अशी मागणी विशाल वाघ यांनी केली आहे. कल्याण ते कर्जत लोकल फेऱ्यांमध्ये वाढ करून, लवकरच या संदर्भात राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे तसेच रेल्वे मंत्र्यांकडे पत्रव्यवहार सुद्धा करण्यात येईल असे वाघ यांनी बोलताना सांगितले.

## जागतिक अन्न सुरक्षा दिन : भूकमुक्त जगाचा संकल्प

महाराष्ट्र जीत

आज आपण तंत्रज्ञान, व्यापार, विज्ञान आणि आरोग्य या क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत आहोत, परंतु या प्रगतीच्या सावलीत अजूनही लाखो लोक भुकेने त्रस्त आहेत. त्यांना पुरेसं, सुरक्षित आणि पोषणमूल्य असलेलं अन्न मिळत नाही. म्हणूनच, 'जागतिक अन्न सुरक्षा दिन' म्हणजे फक्त अन्न किती आहे याचा नाही, तर अन्नाच्या गुणवत्तेचा, पोषणमूल्यांचा आणि वितरणाच्या न्याय्यतेचा विचार करण्याचा दिवस आहे.

अन्नसुरक्षा म्हणजे काय?

अन्नसुरक्षा म्हणजे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या शारीरिक गरजांनुसार सुरक्षित, पौष्टिक आणि पुरेसं अन्न सुलभपणे आणि वेळच्या वेळी मिळणं. याचा अर्थ केवळ अन्न असणं नाही, तर ते उपलब्ध असणं, परवडणं आणि टिकाऊ असणंही आवश्यक आहे.

**भूक हे मानवतेवरचा कलंक:**

भूक ही केवळ पोटाची गरज नाही – ती एक सामाजिक, आर्थिक आणि नैतिक आव्हान आहे. हजारो मुले दरवर्षी कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात. शिक्षण घेण्याऐवजी अनेक मुलांना अन्नासाठी काम करावं लागतं. ही स्थिती आपल्याला विचार करायला लावते – आपण प्रगतीपथावर खरोखर आहोत का?

**अन्नाची असमान वाटणी – मुख्य समस्या:**

जगात अन्नधान्य उत्पादन भरपूर आहे, पण त्याचं योग्य वितरण, साठवणूक आणि व्यवस्थापन यामध्ये अनेक त्रुटी आहेत. एका बाजूला अन्न वाया जातं, तर दुसरीकडे कोट्यवधी लोक उपाशी राहतात. म्हणूनच, अन्नाचा वापर योग्य प्रकारे करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

**आपण काय करू शकतो?**

अन्न वाया घालवू नका: घरात, हॉटेलमध्ये, कार्यक्रमांमध्ये थोडी जागरूकता ठेवल्यास हजारो किलो अन्न वाचू शकते. 'थाळीतील अन्न संपवणे' ही सवय लावा: लहान वयातच मुलांमध्ये अन्नाचा आदर रुजवा. अन्नदान करा: उरलेलं शिल्लक अन्न योग्य पद्धतीने गरजूंपर्यंत पोहोचवा. जनजागृती करा: शाळा, महाविद्यालये आणि संस्थांमधून 'भूकमुक्त जग' अभियान राबवा. शेती आणि शेतकऱ्यांना साथ द्या: अन्ननिर्मितीच्या मुळाशी असणाऱ्या शेतकऱ्यांच्या हितासाठी आवाज उठवा.

**शाळा आणि महाविद्यालयांची भूमिका:**

विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून अन्नाबद्दल कृतज्ञता, संवेदनशीलता, आणि सामाजिक भान निर्माण करण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवर आहे. सहभोजन कार्यक्रम, अन्न वाचवा उपक्रम, आणि अन्नदानाचे संस्कार ही यामध्ये प्रभावी ठरणारी साधने आहेत.

**संकल्प – भूकमुक्त जगाचा:**

भूकमुक्त जग' ही कल्पना अशक्य नाही. ती प्रत्येकाच्या कृतीतून शक्य होऊ शकते. गरज आहे ती जागरूकतेची, सहभागाची आणि सहवेदनेची.

**या जागतिक अन्न सुरक्षा दिनी आपण एक संकल्प करूया –**

"मी अन्नाचा आदर करीन, अन्न वाया घालवणार नाही, आणि जे गरजू आहेत त्यांच्यासाठी शक्य तेवढं योगदान देईन. भूकमुक्त जगासाठी मी सजग राहीन."

एकूणच, जगात कोणतीही व्यक्ती भुकेमुळे झोपता कामा नये – हा मानवतेचा मूलमंत्र आहे. अन्न हे पूर्णब्रह्म मानणाऱ्या संस्कृतीत आपण जन्मलो आहोत. त्यामुळे भूकमुक्त जग घडवणे ही आपली जबाबदारी आहे, नुसती कल्पना नव्हे.

**डॉ. भारत कऱ्हाड**
**दापोली -जिल्हा रत्नागिरी**

# वटपौर्णिमा : निसर्ग, नाते आणि निष्ठेचा संगम

## डॉ. सुवर्णा भारत कराड

महाराष्ट्र जीत

भारतीय संस्कृती ही नात्यांवर, मूल्यांवर आणि श्रद्धेवर आधारित आहे. विविध सण-उत्सवांद्वारे आपल्या संस्कृतीतील परंपरा, सामाजिक समजुती आणि कुटुंबव्यवस्था दृढ केली जाते. वटपौर्णिमा हा अशाच नातेसंबंधांचे प्रतीक असलेला आणि विवाहित स्त्रीच्या सौभाग्याशी निगडीत असलेला एक महत्त्वाचा सण आहे. महाराष्ट्रासह भारतातल्या अनेक राज्यांमध्ये हा सण अत्यंत भक्तिभावाने साजरा केला जातो. या दिवशी स्त्रिया उपवास करून, वटवृक्षाची पूजा करून आपल्या पतीच्या दीर्घायुष्याची कामना करतात. सणामागची ही श्रद्धा आणि परंपरा आजही काळाच्या पडद्यावर ठळकपणे उभी आहे. वटपौर्णिमेच्या सणामागे एक सुंदर आणि प्रेरणादायक पौराणिक कथा आहे. 'सावित्री-सत्यवान' या प्राचीन पुराणकथेत सावित्रीने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर यमराजाशी संवाद साधून, तिच्या धैर्य, शौर्य आणि भक्तीच्या जोरावर सत्यवानाचा जीव परत मिळवला.



ही कथा केवळ भक्तीची नसून, ती स्त्रीच्या आत्मबलाची, विवेकाची आणि नात्यांवरील निष्ठेची आहे. आजही सावित्रीचा आदर्श अनेक महिलांना जीवनात प्रेरणा देतो. वटपौर्णिमेच्या दिवशी विवाहित स्त्रिया नवीन वस्त्रात सजून, वटवृक्षाभोवती तीन वेळा फेरे घालतात, त्याला दोरा बांधतात आणि व्रताची पूजा करतात. पूजा करताना त्या आपल्या पतीसाठी, कुटुंबासाठी, सुख-समृद्धीसाठी आणि आयुष्यभरच्या साथीसाठी प्रार्थना करतात. वटवृक्षाचे स्थान भारतीय परंपरेत खूप उंच आहे. याला 'वटवृक्ष' किंवा 'बड' म्हणून ओळखले जाते. आयुर्वेदात या झाडाचे धार्मिकच नव्हे तर औषधी मूल्यही मानले गेले आहे. वटवृक्षाची मुळे, साल, पाने विविध आजारांवर उपयुक्त मानली जातात. शास्त्रांमध्ये त्याला 'त्रिदेवांचे रूप' मानले गेले आहे – ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांचे प्रतीक म्हणून. वटवृक्ष हा स्थैर्य, समृद्धी, दीर्घायुष्य, ज्ञान आणि संरक्षण याचे प्रतीक मानला जातो. त्याची गडद सावली जीवनातील त्रास, ताप, अंधार दूर करण्याची शक्ती दर्शवते. म्हणूनच वटवृक्षाच्या पायथ्याशी पूजा करणं म्हणजे निसर्गाशी आपलं नातं पुन्हा जोडण्याचा एक सुंदर प्रयत्न असतो. परंतु या सणाच्या संदर्भात एक प्रश्न वारंवार उपस्थित होतो – ही जबाबदारी फक्त स्त्रीचीच का? पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास, प्रार्थना फक्त पत्नीने करावी, पण तिच्या आरोग्याची, तिच्या सुखदुःखाची, तिच्या स्वप्नांची चिंता कोण करणार? आजच्या आधुनिक युगात स्त्री-पुरुष समानतेबाबत बोललं जातं, तेव्हा या सणांचा दृष्टिकोन व्यापक करायला हवा. जर पती-पत्नी दोघांनीही एकमेकांच्या आयुष्यासाठी व्रत पाळले, प्रार्थना केली, एकमेकांच्या सुखदुःखात भाग घेतला, तर त्यात खरी जीवनसिद्धी सामावलेली असेल. त्यामुळे वटपौर्णिमा ही केवळ स्त्रियांचाच सण नसून तो नात्यांतील समर्पण, समजूत आणि श्रद्धेचा उत्सव म्हणून पाहायला हवा. वटपौर्णिमा हा केवळ एक सण नाही, तर तो संस्कार आहे. तो नातेसंबंधांची परंपरा जपणारा दिवस आहे. या दिवशी केवळ बाह्य पूजाच नाही तर अंतःकरणातही शुद्धता निर्माण होते. अशा पूजांमधून महिलांना आपला आत्मविश्वास, आत्मबल आणि धार्मिक भावनिकता टिकवून ठेवण्यास मदत होते. गावाकडील स्त्रिया या सणासाठी दिवसभर अगदी मनोभावे तयारी करतात. पूजा साहित्य, झाडाखालची स्वच्छता, फुले, दोरा, नारळ, फलाहार, सडा-रांगोळी हे सगळं जिव्हाळ्याने केलं जातं. महिला एकमेकींसोबत सामूहिकरीत्या वटवृक्षाची पूजा करतात, गाणी म्हणतात, कथा सांगतात आणि समाजातील बंधुतेचा भाव दृढ करतात. आजच्या शहरी जीवनात मात्र ही परंपरा कमी प्रमाणात दिसते. झाडांची कत्तल, जागेअभावी वृक्षांचे अभाव आणि व्यक्तिवाद वाढल्यामुळे या सणाचा स्वरूपही बदलतो आहे. पण अशा काळातच या सणाचे महत्त्व अधोरेखित होते. वटपौर्णिमा केवळ धार्मिकता नव्हे, तर पर्यावरण संवर्धन, सामाजिक समता, आणि संवेदनशीलतेची पुनर्स्थापना करण्याचा एक मार्ग आहे. आपण जर वटपौर्णिमेला केवळ कर्मकांड म्हणून न पाहता, तिच्या मागील विचारसरणीकडे पाहिलं, तर नक्कीच या सणाला नव्याने अर्थ प्राप्त होतो. ही एक संधी आहे – नात्यांना नव्याने समजून घेण्याची, एकमेकांच्या अस्तित्वाला मान्यता देण्याची. वटवृक्षाच्या सावलीप्रमाणेच आपल्या नात्यांनाही दीर्घायुष्य, स्थैर्य आणि गडद माया लाभावी, अशीच प्रार्थना यानिमित्ताने प्रत्येकजण करावा.

या पवित्र व्रताचे सच्चे स्वरूप म्हणजे श्रद्धा, समर्पण आणि विश्वास. या त्रिसूत्रींवर नातेसंबंधांची खरी उभारणी होते. म्हणूनच वटपौर्णिमा हा सण स्त्री-पुरुष नात्यातील समतोल, प्रेम आणि बंधनाची जाणीव करून देणारा आहे. यानिमित्ताने आपण सर्वांनी एकत्र येऊन निसर्ग, नाते आणि मूल्ये यांची नव्याने जपणूक केली पाहिजे.

**डॉ सुवर्णा भारत कराड**
**महिला आघाडी, महाराष्ट्र**
**मो. ९३७१०६३४८२**

# मुंब्रा लोकल दुर्घटनेत 4 प्रवाशांचा मृत्यू, 9 गंभीर जखमी

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव प्रतिनिधी**

**कळंबोली वार्ताहर:-** सकाळी 9.30 वा. वेळेस रेल्वे मधून प्रवासी पडून मृत्यू. मुबई मायानगरी made कामासाठी जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवासादरम्यान ट्रॅक वरती पडून मृत्यू झाला आणि काही जण जखमी आहेत. दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान आज मोठी दुर्घटना घडली आहे. कसारा-सीएसएमटी आणि सीएसएमटी कर्जत लोकलमधील मुंब्रा लोकल दुर्घटनेत 4 प्रवाशांचा मृत्यू, 9 गंभीर जखमी प्रवाशांची यादी आली समोर या दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. यातील तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. यातील एका प्रवाशाला छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तर तीन प्रवाशांना सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले. दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान आज मोठी दुर्घटना घडली आहे. कसारा-सीएसएमटी आणि सीएसएमटी कर्जत लोकलमधील प्रवाशांमध्ये मुंब्रा स्थानकादरम्यान गुंतागुंत झाली, काहींच्या मते बॅग अडकल्यामुळे दोन्ही लोकलमधील प्रवासी खाली पडल्याची माहिती आहे. आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेनंतर तेरा प्रवासी खाली




कोसळले. यामध्ये चार प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तर ९ प्रवाशांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. यातील तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. यातील एका प्रवाशाला छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तर तीन प्रवाशांना सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर नऊ प्रवाशांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा येथे दाखल करण्यात आले आहे.

**जखमी व्यक्तीची माहिती खालील प्रमाणे:**

१) शिवा गवळी (पुरुष २३ वर्ष, प्रकृती चिंताजनक असल्याने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथून ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.)
२) आदेश भोईर (पु/26 वर्ष, राहणार: आढगाव, कसारा, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत.)
३) रिहान शेख (पु/२६ वर्ष, राहणार: भिवंडी, प्रवास: कल्याण ते ठाणे, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत)
४) अनिल मोरे (पुरुष ४० वर्ष, यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना उपचारासाठी ज्युपिटर हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.)
५) तुषार भगत (पु/२२ वर्ष, प्रवास: टिटवाळा ते ठाणे, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत.)
६) मनीष सरोज (पु/२६ वर्ष, पत्ता: दिवा साबेगाव, दिवा यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत)
७) मच्छिंद्र गोतारणे (पु/३९ वर्ष, राहणार: वाशिंद, यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत)
८) स्नेहा धोंडे (स्त्री/२१वर्ष, राहणार: टिटवाळा, प्रवास: टिटवाळा ते ठाणे यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत)
९) प्रियंका भाटिया (स्त्री/२६ वर्ष, राहणार: शहाड, कल्याण यांची प्रकृती स्थिर आहे व त्यांच्यावर शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत)

## ट्रेकिंग करताना मुंबईतील मुलं दरीत अडकली , रेस्क्यू टीम ठरले देवदूत, तिघांचेही प्राण वाचवले

महाराष्ट्र जीत

**अविनाश जाधव प्रतिनिधी**

**कळंबोली वार्ताहर** - पावसाळ्याच्या दिवसात किंवा अन्य वेळीसुद्धा पर्यटनाला ट्रेकिंग साठी जाताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा आपण अनोळखी ठिकाणी अडकून पडण्याची शक्यता असते व अशावेळी कोणताही प्रसंग ओढवू शकतो. त्यामुळे पर्यटन,ट्रेकिंग, धबधबे आदी ठिकाणी जाताना आनंद घेताना काळजी घेणे आवश्यक ती खबरदारी बाळगणं गरजेचं असतं. असाच काहीसा प्रकार रायगड जिल्ह्यात आज संध्याकाळी धक्कादायक प्रकार खोपोली परिसरात घडला होता. खोल दरी व उंच कडा अत्यंत बिकट अशा भीतीदाय ठिकाणी ही मुलं पाय घसरल्याने अडकून पडली होती. खोपोली पोलीस व येथील सामाजिक संस्था असलेल्या व आपत्कालीन परिस्थितीत नेहमीच रेस्क्यू करण्यासाठी अग्रेसर असलेल्या हेल्प फाउंडेशन ग्रुपच्या साहाय्याने या तीनही मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात आल आहे.

1) रोशन रामस्वरूप विश्वकर्मा वथ. 15 वान, रो भगतसिंगनार नं.2, गोरखणार वेष्ट, राजाराम जल्ली, 2) रामप्रकाश मन्नत केवर मन्नत केवर वय-16 रा. डीनर भानीगकिरसमोर कृष्णा कोगना बिल्डींग, गोरेगाव 3) अभिनव वेणूगोपाळ निंबाला वय-15 1. मोतीलाल नगर गोरेगाव पश्चिम आशिया तीनही मुलांची नावे आहेत.

गुरुवारी दुपारी ते केपी वॉटरफॉल येथे गेले होते. धबधब्यात एंजॉय करतांना त्यातील एकाचा पाय सटकला आणि तो दरीत कोसळला त्याला पकडण्याच्या नादात दुसराही त्याचे मागोमाग कोसळला त्या दोघांना बाहेर काढण्यासाठी तिसरा दरीत उतरला. मात्र त्या तिघांनाही तेथून बाहेर पडणे जमले नाही. एका बाजूला उंच कडा तर दुसऱ्या बाजूला खोल दरी होती. शेवटी त्यांनी पोलिस कंट्रोल रूम येथे संपर्क साधून आपण वाट हरवल्याची माहिती दिली. या घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलीस स्टेशन आणि अपघातग्रस्तांच्या मध्ये सामाजिक संस्थेच्या (हेल्प फाउंडेशन) मेंबर्सनी त्या पर्यटक युवकांनी दिलेल्या लोकेशनवर जाऊन त्यांना सुखरूप बाहेर काढून सुरक्षित वाटेने रात्रीच्या अंधारात खाली आणले आहे. त्या युवा पर्यटनच्या नातेवाईकांशी संपर्क झाला असून खोपोली पोलीस स्टेशनमधे त्यांच्याकडून माहिती घेतली जात आहे. त्याना खोपोली पोलीस स्टेशन येथे सुखरूप पालक येईपर्यंत देखरेखीखाली ठेवण्यात आला असून त्यांना धीर देण्यात आला आहे. ही तीनही मुलं मुंबई गोरेगाव परिसरात राहणारी आहेत. रायगड जिल्ह्यातील कर्जत खोपोली येथील आपत्कालीन परिस्थितीत नेहमीच मदतीचा हात पुढे करणाऱ्या हेल्प फाउंडेशन ग्रुपने आजवर अनेकांचे जीव वाचवले आहेत. ट्रेकिंगला आल्यावर अनेकदा वाट चुकल्याने अडकण्याचे प्रकार या परिसरात अनेकदा घडतात. अशा वेळेला आपत्कालीन परिस्थितीत नेहमीच कर्जत खोपोली परिसरातील हेल्प फाउंडेशन ग्रुप मदत करण्यात नेहमी अग्रेसर असतो. हेल्प फाउंडेशन चे कार्यकर्ते यांनी रात्रीच्या वेळी ही घटनास्थळी धाव घेत तिन्ही मुलांना सुखरूप बाहेर काढल्याने हेल्प फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांच व खोपोली पोलिसांच्या पथकाचं कौतुक करण्यात येत आहे.

दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बंडूभाऊ इंगोले



## प्रतिनिधी नेमणे आहे

संपूर्ण महाराष्ट्रात **“ दैनिक महाराष्ट्र जीत”** या अल्पवधी लोकप्रिय झालेल्या दैनिक वृत्तपत्रास काम करावयास सुवर्णसंधी आता प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे नवनिर्वाचित प्रतिनिधी छायाचित्रकार लेखक जाहिरातदार नेमणे आहे चला संधीचा फायदा...

**संपर्क**

मुख्य संपादक :
**सागर राणा अंभोरे**
मो. 99210 45121

संपादक :
**बंडूभाऊ इंगोले**
मो. 96044 30002

**ड्रॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक कारंजा जी. वाशीम**